'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY,**

P.B. NO.: 80, UMAVI NAGAR, **JALGAON**-425001 (M.S.)

**रोप्य महोत्सवी वर्ष-2014 - 15**

***महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र***

दि .३०/११/२०१५

# गांधी सप्ताह-२०१५

(दि.०२ ऑक्टोबर ते ०८ ऑक्टोबर)

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माननीय कुलगुरु महोदयांच्या दि १६/०९/२०१५ च्या मान्यतेंनूसार **"गांधी सप्ताह-२०१५"** खालील प्रमाणे साजरा करण्यात आला; त्याचा वृतांत पुढील प्रमाणे सविनय सादर करीत आहेत.

## दि.०२ ऑक्टोबर २०१५ रोजी महात्मा गांधी टेकडीवर भजनांचा कार्यक्रम :-

दि.०२ ऑक्टोबर २०१५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या गांधी टेकडीवर भजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होता. सुरवातीला प्रास्ताविक डॉ.अनिल चिकाटे यांनी केले. त्या नंतर माननीय प्रभारी कुलगुरु आणि मा. कुलसचिव महोदयांनी त्यांच्या शुभ हस्ते महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला त्यानंतर संगीत विभाग प्रमुख मा प्रा.संजय पत्की आणि त्यांच्या समुहाने महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारीत गीतरचना सकाळी ८ ते ९ या दरम्यान सादर केली. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व समन्वयक उपस्थीत होते.

## दि.०३ ऑक्टोबर २०१५ रोजी चित्रकला स्पर्धा- गांधी जीवन- सत्याग्रह :-

केंद्रीय विद्यालय, उमवि येथे सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० या वेळेत गांधी जीवन- सत्याग्रह या विषयास अनुसरुन चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते सदर स्पर्धेत इयत्ता पाचवी ते सातवी प्रर्यंतच्या ४० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. विद्यार्थ्यांना आयोजका तर्फे सहभागी स्पर्धकांना चित्रकलेसाठी पेपर पुरविण्यात आले होते तसेच सहभागी विद्यार्थ्यांना अल्पोहार म्हणून केळी देण्यात आली या स्पर्धेसाठी केंद्रीय विद्यालयातील देशपांडे सर यांनी मदत केली या स्पर्धेतील एकूण ४० विद्यार्थ्यांमधून

निवड समिती ने प्रथम - अव्दितीया पाटील -रु.५००/ व्दितीय कल्याणी गरुड रु.३००/- तृतीय अथर्व जडे रु.२०० तसेच उत्तेजनार्थ म्हणून प्रथम सुयश पाटील रु.१००/- व्दितीय - नेहा पवार रु.१००/- यांची निवड केली. यात इतर विद्यार्थी व पालक यांचा सहभाग लाभला.

दि.०४ ऑक्टोबर २०१५ रोजी एकदिवसीय व्यक्तीमत्व विकास शिबीराचे आयोजन :-

विद्यापीठाचे प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर येथे एक दिवशीय व्यक्तीमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले होते सदर एक दिवशीय व्यक्तीमत्व विकास शिबिरात अमळनेर परिसरातील महाविद्यालयांचा सहभाग मिळाला असून यात जवळ पास निवडक ६० विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता. सुरवातीला व्यक्तीमत्व विकास शिबीराचे उद्‌घाटन मा. प्राचार्य डॉ. एल.अे. पाटील यांनी दिप प्रज्वलन करुन केले. या कार्यक्रमास प्रास्तावीक डॉ.अनिल चिकाटे यांनी केले. सुत्र संचलन प्रा.डॉ.धनंजय चौधरी यांनी केले. प्राचार्य डॉ. एल.अे. पाटील यांनी महात्मा गांधी विचारांना आजच्या युवकांना कसे आत्मसात करावे या दृष्टीने सप्तपदी च्या माध्यमातून मार्गदर्शन केले. मा.प्रा.डॉ. डी.एन.वाघ यांनी महात्मा गांधीच्या स्त्री मुक्तीच्या संदर्भात मांडणी केली. प्रा. डॉ. हरेश चौधरी यांनी महात्मा गांधी आणि वैज्ञानीक दृष्टीकोन या बाबत मार्गदर्शन केले. प्रताप तत्वज्ञान केंद्र विभागाच्या प्रभारी प्रमुख ,प्रा. राधिका पाठक, प्रा डॉ मुकेश भोळे, उपप्राचार्य प्रा.डॉ. कल्पना पाटील तसेच अमळनेर येथील विविध महाविद्यालयांचे एन.एन.एस विभागाचे समन्वय उपस्थित होते या शिबीरात धनदाई महाविद्यालय,अमळनेर,नेहरु समाजकार्य महाविद्यालय,प्रताम महाविद्यालय अमळनेर, म.तु.पाटील महाविद्यालय मारवाड या महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता सर्व विद्यार्थ्याना दुपारी जेवण देण्यात आले हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रताप केंद्राचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले शेवटी प्रा.डॉ.व्ही.बी.माटे यांनी सर्व समन्वयांकांचे सहभागी विद्यार्थ्यांचे व प्रताप केंद्रातील शिक्षकेतर कर्मचारी यांचे आभार मानले.

दि.०५ ऑक्टोबर २०१५ रोजी एक दिवशीय श्रमदान शिबीर, एकलव्य केंद्र नंदुरबार :-

एक दिवशीय श्रमदान शिबीराचे आयोजन एकलव्य केंद्र नंदुरबार येथे करण्यात आले होते या वेळेस **परिसर स्वच्छता** हा उपक्रम राबविण्यात आला या एक दिवशीय श्रमदान शिबीरा साठी ६४ विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभाग घेवून केंद्राचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला या शिबीरासाठी जिजामाता महाविद्यालय नंदूरबार येथील एन.एस.एस चे

कार्यक्रम अधिकारी प्रा. दुर्योधन देविसींग राठोड तसेच प्रा. कांतीलाल गोबा वसावे सहा कार्यक्रम अधिकारी यांनी त्याच प्रमाणे जी.टी.महाविद्यालय नंदूरबार येथील प्रा.डॉ. माधव कौतीक कदम व प्रा. मनोज त्र्यंबक शेवाळे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले त्याच प्रमाणे एकलव्य केंद्र नंदुरबार येथील कक्षधिकारी श्री. वळवी व सर्व कर्मचा-यंनी मोलाची मदत केली

### दि.०६ ऑक्टोबर २०१५ रोजी व्याख्यानाचा कार्यक्रम :-

दि.०६ ऑक्टोंबर रोजी सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत सामाजीक शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. "गांधीजींची अहिंसा व आजचा युवक" या विषयावर उमविचे माजी अधिष्ठाता प्रा.डॉ. शिरीष बुधा पाटील यांनी सदर विषयावर युवकांना प्रेरीत केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विचार धारा प्रशाळेच्या संचालीका प्रा.डॉ.अर्चना देगावकर उपस्थीत होत्या. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. अनिल चिकाटे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला या कार्यक्रमास शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थीत होते. आभार व सुत्र संचालन डॉ. अनिल चिकाटे यांनी केले.

### दि.०७ ऑक्टोबर २०१५ रोजी रक्तदान शिबीर :-

जिल्हा सरकारी रुग्णालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यापीठाच्या विविध विभागातील ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठाचे मा. कुलसचिव प्रा.डॉ.ए.एम. महाजन व ग्रंथपाल डॉ.टि.आर. बोरसे यांनी जिल्हा सरकारी रुग्णालयाचे डॉ. उमेश कोल्हे आणि त्यांचे सहयोगी श्री.हरीष पाटील,प्रभाकर पाटील व इतर सहकारी यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. हे शिबीर सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेप्रर्यंत चालले हा कार्यक्रम यशस्ती होण्यासाठी मध्यवर्ती ग्रंथालयाचे कर्मचारी यांचा सहभाग लाभला.

### दि.०८ ऑक्टोबर २०१५ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन :-

विद्यापीठाच्या प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचा विषय "जागतिक दहशदवाद आणि गांधी विचार धारा " असा ठेवण्यात आला होता. या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दुपारी ०२.३० ते ०५.३० या वेळेत विद्यापीठाच्या

सामाजीक शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात करण्यात आले होते या स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधारा प्रशाळेच्या प्रा.डॉ. सरोज डांगे व रसायन शास्त्रे प्रशाळेचे प्रा.डॉ.दिपक दलाल परिक्षक म्हणुन लाभले होते स्पर्धेच्या सुरुवातीला विचार धारा प्रशाळेच्या संचालीका प्रा.डॉ.अर्चना देगावकर यांनी दोन्ही परिक्षकांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले आणि सहभागी विद्यार्थ्यांना गांधी विचारांवर मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या त्याच प्रमाणे आयोजक डॉ.अनिल चिकाटे यांनी स्पर्धेची प्रस्तावना व विषय मांडणी संदर्भात विद्यार्थ्यांना वेळ व नियम या विषयी सांगीतले या स्पर्धेअंती दोन्ही परिक्षकांच्या निर्णयानुसार बक्षीस म्हणून प्रथम विजेता- कु.प्रियांका ज्ञानेश्वर ठाकूर यास रु५००/-, व्दितीय विजेता- वसंत शिवाजी कुलकर्णी यास रु ३००/-,तृतीय विजेता-कल्पेश भीकनराव देशमुख यास रु २००/- तसेच उत्तेजनार्थ बक्षीसपात्र प्रथम- अमोल भास्कर सुरवाडे रु.१००/- व्दितीय दिनेश केशव पाटील रु १००/- तृतीय- धीमंत पी आर आंबेडकर रु १००/-,चतुर्थ- राजेंद्र दिनकर दौड रु.१००/। अशा प्रकारे या गांधी सप्ताहा पासुन विद्यार्थ्यांना रोख स्वरुपात बक्षिस देण्यात आली.

उपरोक्त गांधी सप्ताह साजरा करण्यासाठी माननीय कुलगुरु महोदयांचे व माननीय कुलसचिव महोदयांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले असून विद्यापीठातील अधिकारी,कर्मचारी मध्यवर्ती ग्रंथालयातील ग्रंथपाल व कर्मचारी, महात्मा गांधी अध्ययन केंद्राचे कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक, अधिकारी आणि कर्मचारी त्याच प्रमाणे प्रा सत्यजीत साळवे ,संचालक विद्यार्थी कल्याण विभाग,जनसंपर्क अधिकारी, व त्या त्या केंद्रातील कर्मचारी या सर्वांचे सकारात्मक सहकार्य लाभले. या गांधी सप्ताहाच्या सर्व कार्यक्रमास सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना "कार्यक्रम सहभाग" प्रमाण पत्र देण्यात आलीत.

(डॉ.अनिल नानाजी चिकाटे)
प्रभारी प्रमुख
महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र